क्रं./यजिप/शिवि/माध्य/ /०१२
यवतमाळ जिल्हा परिषद यवतमाळ.
शिक्षण विभाग (माध्य)
यवतमाळ दिनांक.

प्रति,

मा.शिक्षणाधिकारी (प्राथ)
जिल्हा परिषद यवतमाळ.

विषयः- तालुकास्तरावर व जिल्हा स्तरावर कार्यरत एका साधन व्यक्तीकडे मित्र उपक्रमाचे काम सोपविणे बाबत.

संदर्भः- मा.सहसंचालक,(प्रशा)म.प्रा.शि.प.मुंबई यांचेकडील पत्र जा.क्रं.मप्राशिव/सशिअ/प्रशि/२०१२-१३/ ३५०० दिनांक १५ सप्टेंबर २०१२.

उपरोक्त संदर्भीय पत्राचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, दिनांक २७ जानेवारी २०१२ च्या शासन परिपत्रकानुसार सर्वशिक्षा अभियानाअंतर्गत कार्यरत एका कार्यक्रम अधिका-याकडे मित्र उपक्रमाच्या कार्यवाहीकरीता जबाबदारी सोपविण्यात आलेली आसून तो पूर्ण वेळ कार्यरत आहे.तथापि मा.सहसंचालक (प्रशा) म.प्रा.शि.व.मुंबई यांनी तालुका स्तरावर व जिल्हास्तरावर समन्वयक मित्र उपक्रम असे स्वतंत्र पद निर्माण करण्याऐवजी तालुका स्तरावर व जिल्हास्तरावर कार्यरत एका साधनव्यक्तीकडे मित्र उपक्रमाचे काम सोपविण्यात यावे .असे निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार कृपया सर्वशिक्षा अभियान अंतर्गत तालुका/जिल्हास्तरावर कार्यरत एका साधनव्यक्तीकडे उपरोक्त मित्र उपक्रमाचे काम सोपविणे बाबत आपले स्तरावरुन सर्व संबंधीतांना आदेश निर्गमित व्हावे ही विनंती.

आपला

शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद यवतमाळ.

प्रतिलीपीः- १) मा.मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा.सहसंचालक,(प्रशा) म.प्रा.शि.परीषद मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
३) मा.शिक्षण उपसंचालक,अमरावती विभाग अमरावती यांना माहितीस्तव सविनय सादर.
४) प्रत माहिती तथा अनुषंगिक कार्यवाहीस्तव अग्रेषीत, गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती सर्व -------------------- जिल्हा यवतमाळ.